# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे

मुख्य कचेरी : ४ ब, बी.जे. रोड, पुणे - ४११००१.

PDCC BANK ✲ पो. बॉक्स नं.१०९ ✲ दुरध्वनी क्र.: २६१३३८३३, २६१३९३००. ई-मेल: punedcc@gmail.com


## निविदा – सूचना

**मोहोरबंद निविदा दि.२९.०३.२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत प्रशासन विभाग मुख्यकचेरी येथे स्विकारण्यात येतील. त्यानंतर येणाऱ्या निविदांचा विचार केला जाणार नाही.**

बँकेस खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे करार पध्दतीवर तीन वर्षाकरीता सेवा पुरविणेकामी नोंदणीकृत मान्यताप्राप्त व बँकींग अस्थापनांस सेवा पुरविण्याऱ्या विशेष अनुभवी एजन्सीकडून मोहोरबंद निविदा (दरपत्रके) मागविण्यात येत आहेत. बँकेच्या पुणे जिल्ह्यात एकूण २९० शाखा ४ विस्तारित कक्ष, १५ झोनल ऑफिस व मुख्य कार्यालय इ. कार्यरत आहेत. सेवांचा तपशिल खालीलप्रमाणे...

**अ) बँकेच्या मुख्यकचेरी/शाखांकरीता सिक्युरिटी गार्डची व्यवस्था करणे.**

१. बँकेच्या एकूण २९० शाखा, ४ विस्तारित कक्ष, १५ झोनल ऑफिस व मुख्य कार्यालय इ. करीता आवश्यकतेनुसार साधारणतः ५०० साधे सुरक्षारक्षक पुरविण्याची व्यवस्था करावी लागेल.

२. महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन कायद्याप्रमाणे झोननुसार तासासाठीचे दर नमूद करावेत.

३. सिक्युरिटी गार्डस् हे सुदृढ व प्रशिक्षित असावेत. तसेच किमान उंची १६० से.मी., छाती ८० से.मी. व वजन ५० कि.ग्रॅ. तसेच त्याचे वय ५० वर्षा पेक्षा जास्त नसावे. नियुक्तीवेळी चारित्र्य प्रमाणपत्र दाखल करुन घ्यावे लागेल. कंत्राटी एजन्सीने गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या/अफरातफर केलेल्या व्यक्तीची नियुक्ती करु नये.

४. एजन्सीकडे महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळाची सूट/नोंदणी असणे आवश्यक आहे.

५. प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सीज् रेग्युलेशन ॲक्ट २००५ अन्वये परवाना असणे आवश्यक आहे.

६. सिक्युरिटी गार्ड एजन्सीकडे बँकांना गार्ड पुरविण्याचा अनुभव असावा.

७. बँकेच्या बहुतांश शाखा ग्रामीण भागात असल्याने तेथे सिक्युरिटी गार्ड यांना कामकाज करावे लागेल.

८. उपरोक्त सर्व बाबींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी सदर कंत्राटी एजन्सीची राहील.

**ब) बँकेच्या मुख्यकचेरी /ठराविक शाखांकरीता गनमॅन (बंदुकधारी) सिक्युरिटीगार्डची व्यवस्था करणे.**

१. बँकेच्या मुख्यकचेरी व १५ झोनल ऑफिस संलग्न शाखांकरीता इ. करीता साधारणतः ३० गनमॅन (बंदुकधारी) सिक्युरिटी गार्डची व्यवस्था करावी लागेल.

२. महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन कायद्याप्रमाणे झोननुसार तासासाठीचे दर नमूद करावेत.

३. गनमॅन (बंदुकधारी) सिक्युरिटी गार्डस् हे सुदृढ, प्रशिक्षित व बंदुकधारी परवानाधारक असावेत. तसेच किमान उंची १६० से.मी., छाती ८० से.मी., वजन ५० कि.ग्रॅ. व वय ५० वर्षा पेक्षा जास्त नसावे. नियुक्तीवेळी चारित्र्य प्रमाणपत्र दाखल करुन घ्यावे लागेल. कंत्राटी एजन्सीने गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या/अफरातफर केलेल्या व्यक्तीची नियुक्ती करु नये.

४. एजन्सीकडे महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळाची सूट/नोंदणी असणे आवश्यक आहे.

५. प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सीज् रेग्युलेशन ॲक्ट २००५ अन्वये परवाना असणे आवश्यक आहे.

६. गनमॅन(बंदुकधारी) सिक्युरिटी गार्ड एजन्सीकडे बँकांना गनमॅन (बंदुकधारी) गार्ड पुरविण्याचा अनुभव असावा.

७. उपरोक्त सर्व बाबींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी सदर कंत्राटी एजन्सीची राहील.

..२..

## आवश्यक कागदपत्रे व माहिती

१. उपरोक्त नमुद केलेल्या अटी शर्ती पूर्ण करणाऱ्या संस्थां निविदा दाखल करण्यास पात्र होऊ शकतील.

२. सदर निविदेमध्ये नमूद करावयाच्या शुल्कामध्ये महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन कायद्याप्रमाणे झोननुसार तासासाठीचे दर नमुद असावेत.

३. शासनाचे नोंदणीप्रमाणपत्र, प्राप्तीकर व जीएसटी अंतर्गत नोंदणीप्रमाणपत्र, आयकर रिटर्न दाखल केल्याचा पुरावा इ.

४. इनकम टॅक्स ॲक्ट, प्रॉव्हिडंट फंड ॲक्ट, ई.एस्.आय्.सी./वर्कमन कॉम्पेन्सेशन ॲक्ट, लेबर रेग्युलेशन ॲक्ट व महाराष्ट्र शासन किमान वेतन कायदा इ. संबंधित कायद्यातील तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

५. सर्व्हिस चार्ज, इन्कमटॅक्स ॲक्ट मधील टी.डी.एस्. व जी.एस.टी. बाबतच्या तरतूदी विचारात घेऊन शुल्कदर स्वतंत्रपणे नमूद करण्यात यावेत. तसेच शासनाचे वेळोवेळी कायद्यानुसार होणारे बदल आपणास बंधनकारक राहतील.

६. सदर कंत्राटी एजन्सीचे किमान रु.१.०० कोटी पर्यंत नेटवर्थ असणे आवश्यक आहे.

७. सिलबंद दरपत्रके/निविदा बँकेच्या प्रशासन विभागाकडे दि.२९.०३.२०२३ पर्यंत दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

८. सर्वात कमी रकमेचे दरपत्रक मान्य करण्याचे बंधन बँकेवर असणार नाही. सदर संस्थेला बँकींग अस्थापनास सेवा पुरविण्याचा विशेष अनुभव विचारात घेऊन निवड केली जाईल.

९. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार बँकेचा राहील. तसेच सर्व अगर कोणतेही कारण न देता दरपत्रक नाकारण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे.

१०. उपरोक्त सेवांकरीता आवश्यक मनुष्यबळ गरजेनुसार कमी जास्त करण्याचा अधिकार बँकेस राहील.

११. बँकेने संमत केलेल्या विविध नमुन्यात करार करणे बंधनकारक राहील.

१२. बँकेने निश्चित केलेली रक्कम सुरक्षा ठेव म्हणून बँकेत जमा करणे बंधनकारक राहील. सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

१३. वरील अटी व शर्तीमध्ये वाढ/कमी/दुरुस्त करण्याचा अथवा संपुर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे.

**(स्वाक्षरी)**
**अनिरुद्ध य. देसाई**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**